उद्यानभाग

# सीताफळाची लागवड आणि कीड तसेच रोगांचा बंदोबस्त

प्रा. अंकित खेडीकर
प्रा. भूषण वंजारी
प्रा. रेखा समरीत
उद्यानविद्या विभाग,
श्री सेवकभाऊ वाघाये पाटील
कृषी महाविद्यालय,
केसलवाडा वाघ, जि. भंडारा



सीताफळाच्या बागेत आच्छादन करावे; त्यामुळे पाण्याचे बाष्पीभवन कमी होते आणि जिवाणू संवर्धनास मदत होते. तणांचा प्रादुर्भाव कमी होतो. झाडांची उत्पादकता वाढते व चांगल्या प्रतीची फळे उत्पादित होतात. या पिकामध्ये उन्हाळी बहार घेत असताना वाफ्याच्या कडेने किंवा ड्रीपजवळ मका किंवा बाजरी या पिकांची लागवड करावी. त्यामुळे झाडाजवळील तापमान नियंत्रित राहून फुलगळ व फळगळ होत नाही.

सीताफळाची मृगबाग लागवड शक्यतो जून ते सप्टेंबर या दरम्यान केली जाते. लागवडीपासूनच योग्य ती काळजी घेतल्यास सीताफळ उत्तम नफा मिळवून देते.

**जमिनीची निवड :** लागवडीसाठी मध्यम ते हलकी, पाण्याचा उत्तम निचरा होणारी, भरपूर सेंद्रिय पदार्थ व सामू ६.५ ते ८.० दरम्यान असलेली जमीन निवडावी. हे पीक उथळ, हलक्या मुरमाड डोंगरउताराच्या जमिनीत चांगले वाढते. हलकी ते मध्यम, काळी, चांगली निचरा होणारी जमीन सुयोग्य होय. भारी काळ्या, चिबड, पाणी साठून राहणाऱ्या अल्कलीयुक्त किंवा चोपण जमिनीत लागवड करू नये. हलक्या जमिनीत एक फुटाच्या आत खोलीत खडकाची तळी लागल्यास लागवड करू नये. उत्तम निचरा असणाऱ्या जमिनीत हे फळपीक चांगले येते.

**लागवड :** सीताफळाची लागवड मुरमाड जमिनीमध्ये ४.० x ४.० मी. अंतरावर तर मध्यम काळ्या जमिनीत ५.० x ५.० मी. अंतरावर करावी. ४५.० x ४५.० x ४५.० सें.मी. या आकाराचे खड्डे करून त्यात एक ते दीड घमेले चांगले कुजलेले शेणखत अथवा कम्पोस्ट खत, १ किलो सुपर फॉस्फेट, १० टक्के कार्बारिल पावडर घालून मातीत मिसळून खड्डे भरावेत.

**सीताफळाच्या जाती :** सीताफळ लागवडीसाठी बालानगर, टी.पी.-७, धारूर - ६, अर्कासहन या जातींची निवड करावी.

**मृगबागेत द्यावयाची काळजी :** सीताफळाच्या पावसाळी बहारासाठी बागेत आच्छादन करावे. पाणी सोडण्यापूर्वी झाडांची खोडे दोन फुटांपर्यंत पूर्ण रिकामी करावीत. त्यावर बोर्डो मिश्रण, बुरशीनाशक, कीटकनाशकयुक्त लेप लावावा.

सीताफळावर पडणाऱ्या प्रकाशकिरणांना परावर्तित करून पानाचे तापमान व बाष्पोत्सर्जनाची तीव्रता कमी करण्यासाठी ६ टक्के केओलिनची फवारणी करावी.

सीताफळाच्या बागेत आच्छादन करावे; यामुळे पाण्याचे बाष्पीभवन कमी होते आणि जिवाणू संवर्धनास मदत होते. तणांचा प्रादुर्भाव कमी होतो. झाडांची उत्पादकता वाढते व चांगल्या प्रतीची फळे उत्पादित होतात. या पिकामध्ये उन्हाळी बहार घेत असताना वाफ्याच्या कडेने किंवा ड्रीपजवळ मका किंवा बाजरी या पिकांची लागवड करावी. त्यामुळे झाडाजवळील तापमान नियंत्रित राहून फुलगळ व फळगळ होत नाही.

**कीड व रोग व्यवस्थापन :** सीताफळावरील मिलिबगच्या (पिठ्या ढेकूण) नियंत्रणासाठी निंबोळी अर्क ५% किंवा क्लोरोपायरिफॉस २५ मि.लि. किंवा बुप्रोफेन्झिन १५ मि.लि. अधिक फिश ऑईल रोझिन सोप २५ ग्रॅम प्रति १० लिटर पाण्यात मिसळून फवारणी करावी.

सीताफळावरील अर्थक्रीज व बुरशीजन्य रोगांच्या नियंत्रणासाठी १% बोर्डो मिश्रणाची फवारणी करावी.

सीताफळ बागेतील सूत्रकृमींच्या नियंत्रणासाठी झाडांच्या सभोवताली झेंडूसारखी सापळा पिके लावावीत.

सीताफळास कळी लागणे, फळधारणा आणि फळांच्या वाढीच्या अवस्थेत जून-जुलै ते सप्टेंबर-ऑक्टोबरमध्ये पाण्याची गरज असते. सुरवातीच्या काळात हलक्या जमिनीत ५ ते ६ दिवसांनी मध्यम जमिनीत ८ ते १०



दिवसांनी आणि भारी जमिनीत १० ते १२ दिवसांनी पाणी द्यावे.

सीताफळ बागेत फळे काळी पडणे (फळसड) या रोगाच्या नियंत्रणासाठी फळधारणा झाल्यापासून दर १५ दिवसांच्या अंतराने बोर्डो मिश्रण (१%) किंवा मॅन्कोझेब २ ग्रॅम + कार्बेडेझिम १ ग्रॅम प्रति १० लिटर पाण्यात मिसळून फवारणी करावी.

सीताफळ तोडणीस आल्यास फळांवरील खवले उंचावतात (डोळा पडतो), खवल्यात खोलगट भागाचा रंग पांढरट पिवळा दिसतो, हिरव्या असलेल्या फळांना फिक्कट हिरवी पिवळसर छटा येते. फळ मऊ किवा नरम बनते. अशी लक्षणे दिसल्यास फळांची काढणी करावी. फळे तोडताना देठासहित तोडावीत. प्रतवारी करून बाजारात विक्रीसाठी पाठवावीत. ■